पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ ७१८ /२०१३
दिनांक - ०२/०८/२०१३

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक ०७/०८/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ५**

दिनांक :- ०७/०८/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १७/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.४**) सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** मा.क प्रभाग समिती सभा दि.७/९/२०११ ठराव क्र.४२ नुसार प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील हरित विभागातील क्षेत्र लगतच्या निवासी विभागासह यापूर्वी मनपाचे नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झाले आहे. तथापि गाव मौजे - बो-हाडेवाडी येथील नविन गट नंबर ७५ व लगतचे क्षेत्र प्राधिकरणने संपादन केलेले नाही. मात्र सदर क्षेत्र नजरचुकीने प्राधिकरणाचे नियंत्रणाखाली ठेवले गेले आहे. या ठिकाणी विकास परवानगी घेणेसाठी जमीनधारक प्राधिकरणाकडे गेल्यास क्षेत्र मनपाचे नियोजन नियंत्रणाखाली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येते व यापूर्वी मनपाकडे आलेले क्षेत्रात या जागेचा समावेश नसल्याने मनपा मार्फत विकास परवानगी देण्यात येत नाही. सबब असे सर्व क्षेत्राचा शोध घेऊन ते मनपाचे नियोजन नियंत्रणात घेऊन म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर क्षेत्राच्या झोन निश्चितीची कार्यवाही करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०७/०८/२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे / अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर ' नो पार्कींग ' झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक

पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व ' नो पार्कींग ' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/ ७१८ /२०१३
दिनांक - ०२/०८/२०१३.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda५doc.